नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ३०/०४/२०२६ ( गुरूवार )**

---

## नागपूर ग्रामीण जिल्ह्यात वाहतूक अंमलदारांना वाटप करण्यात आले 'एअर कूल्ड जॅकेट'( Air Cooled Jacket )

सध्या वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर वाहतूक अंमलदारांचे आरोग्य व सुरक्षा लक्षात घेता मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात नागपूर ग्रामीण जिल्हयातील पोलीस स्टेशन आणि जिल्हा वाहतुक शाखा येथील सर्व वाहतूक अंमलदारांना आज दिनांक ३०/०४/२०२६ रोजी 'एअर कूल्ड जॅकेट' **(Air Cooled Jacket)** चे वाटप करण्यात आले आहे. उन्हाळ्यातील तीव्र तापमानात दिवसभर रस्त्यावर कर्तव्य बजावताना होणारा त्रास कमी व्हावा आणि उष्माघातासारख्या धोक्यांपासून संरक्षण मिळावे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला आहे.

नागपूर ग्रामीण जिल्हयात वाहतूक नियंत्रणासाठी सतत विशेष मोहिमा राबविण्यात येत असून, या मोहिमांदरम्यान अंमलदारांना दीर्घकाळ उन्हात उभे राहून कर्तव्य पार पाडावे लागते. त्यामुळे वाढत्या तापमानाचा त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असते. या पार्श्वभूमीवर एअर कूल्ड जॅकेटचा वापर केल्यास शरीराचे तापमान नियंत्रित राहुन त्यांना कर्तव्य बजावतांना तिव्र उन्हापासुन दिलासा मिळेल. या उपक्रमामुळे वाहतूक अंमलदार अधिक कार्यक्षमतेने व सुरक्षितपणे आपली जबाबदारी पार पाडू शकतील, तसेच नागरिकांना अधिक प्रभावी सेवा देणे शक्य होणार आहे.

मा पोलीस अधीक्षक यांनी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व पोलीस अधिकारी आणि अंमलदार यांना उन्हापासुन स्वतःची काळजी घेवुन सुरक्षीतता बाळगुन कर्तव्य बजावण्याबाबत सुचना दिल्या आहेत.











## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## वाहनासह २० लाख २५ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त
## जिल्हा वाहतुक शाखा नागपूर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन पारशिवनी** :— दिनांक २९/०४/२०२६ रोजी जिल्हा वाहतूक शाखा नागपूर ग्रामीण येथील स्टाफ वाहतूक केसेस करणेकामी नाकाबंदी करीत असता पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा डोरली ते तामसवाडी रोडवर अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी श्री दत्त मंदीर समोर डोरली ते तामसवाडी रोडवर जावुन पाहणी केली असता संशयित टिप्पर क्रमांक एम एच ३७ टी १९७६ मिळुन आल्याने ट्रक चालकाला थांबविले असता ट्रक चालक आरोपी हा वाहनातुन उडी मारून पळून गेला. घटनास्थळी टिप्पर क्रमांक एम एच ३७

टी १९७६ मिळुन आले. टिप्परची पंचासमक्ष पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली.

**पोलीसांनी पंचासमक्ष १) टिप्पर क्रमांक एम एच ३७ टी १९७६ किंमती २०,००,०००/—रूपये त्याला २) ०५ ब्रास रेती किंमती २०,०००/— रूपये, आणि ३) ०१ अॅडरॉइड मोबाईल किंमती ५०००/—रूपये असा एकुण २०,२५,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. नमुद टिप्पर क्रमांक एम एच ३७ टी १९७६ चालक १) शिवप्रसाद शांताराम इनवाती, रा. छिंदवाडा (मध्यप्रदेश) ०२) मालक नामे कार्तिक वेलस्वामी येसने, रा. न्यु गजानन मंदीर, चिचोली खापरखेडा यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन पारशिवनी येथे कलम ३०३(२), ४९, ३(५) भा.न्या.सं, सहकलम ४८,(७), (८) महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम, सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन्ही आरोपीतांना दिनांक २९/०४/२०२६ रोजी अटक करण्यात आली आहे.**




**कारवाई करणारे पोलीस पथक जप्त मुद्देमालासह**

## क्रिकेट सट्टा /बेटिंग लावुन जुगार खेळणाऱ्याविरूध्द गुन्हा नोंद
## ४२ हजार ४०० रूपयाचा मुद्देमाल जप्त
## काटोल पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन काटोलः—** दिनांक २८/०४/२०२६ रोजी काटोल पोलीस पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदार मार्फतीने माहीती प्राप्त झाली की, बी.एस.एन.एल कार्यालय काटोल येथे बसुन नुडल्स मंच्युरीयनचा ठेवला लावुन विक्री करणारा राजेश कुशवाह हा टाटा इंडीयन प्रिमीयर लीग २०२६ या सिरीजमधील राजस्थान रॉयल्स विरूद्ध पंजाब किंग ११ या संघादरम्यान लाईव्ह क्रिकेट सामन्यावर मोबाईल द्वारे लोकांकडुन पैसे घेवुन हार जीतचा जुगार खेळत व खेळवीत आहे. अशा विश्वसनिय माहीतीवरून पोलीस घटनास्थळी पोहचुन धाड टाकली असता नमुद घटनास्थळी **आरोपी नामे राजेश रामप्रकाश कुशवाह, वय २४ वर्ष, रा. शारदा चौक, काटोल हा मिळुन आला.** सदर आरोपीने अँड्रॉइड मोबाईल मध्ये आयडी तयार करून बेटींग साईटवरून स्वत:च्या आर्थिक फायदयासाठी क्रिकेट सट्टयावर ग्राहकाकडुन ऑनलाईन पैसे घेतल्याचे दिसुन आले.

**पंचासमक्ष अरोपीच्या ताब्यातुन १) आयफोन १४ प्रो मॅक्स कंपनीचा मोबाईल किंमती ४२,०००/— रुपये. २) रोख रक्कम ४००/— रुपये असा एकूण ४२,४००/— रुपयांचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी नामे रामप्रकाश कुशवाह, वय २४ वर्ष, रा. शारदा चौक, काटोल यांच्या विरुद्ध पोलीस स्टेशन काटोल येथे  कलम कलम १२(अ) म. जू. का. अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.**

## नागपुर ग्रामीण जिल्हयात अवैध जुगार खेळणाऱ्यांवर तसेच चालवणाऱ्यावर ०७ गुन्हे नोंद.
## एकुण ४५,३८०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त

दिनांक २९/०४/२०२६ रोजी महाराष्ट्र जुगार कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशन यांनी अवैधरित्या सट्टापट्टी चालविणाऱ्या तसेच ५२ ताशपत्त्याचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांवर छापा टाकुन सटट्रापटट्री साहित्य, ५२ ताशपत्ते व रोख रक्कम असा एकुण

४५,३८०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये एकुण ०७ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. ते खालीलप्रमाणे.

**पोलीस स्टेशन वेलतूर** अंतर्गत मौजा डोंगरमौदा येथे आरोपी नामे पुरुषोत्तम निळकंठ कावळे, वय ४२ वर्ष, रा. डोंगरमौदा, ता. कुही, जि. नागपुर हा सट्टापट्टी चालवित असताना मिळुन आला. सट्टापट्टी साहित्य व नगदी ४८०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. **पोलीस स्टेशन काटोल** अंतर्गत बीएसएनएल कार्यालय जवळ काटोल येथे आरोपी नामे राजेश रामप्रकाश कुशवाह, वय २४ वर्ष, रा. शारदा चौक काटोल हा क्रिकेट सामन्यावर मोबाईल द्वारे लोकांकडुन पैसे घेवुन हार — जीतचा जुगार खेळताना मिळुन आल्याने त्यांचे नगदी ४००/— रूपये, ०१ मोबाईल असा एकुण ४२,४००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. **पोलीस स्टेशन नरखेड** अंतर्गत मौजा खरसोली येथे आरोपी नामे अक्षय अनिल तायवाडे, वय २० वर्ष, रा. खरसोली, त. नरखेड सट्टापट्टी चालवित असताना मिळुन आल्याने सट्टापट्टी साहित्य व नगदी २४५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. **पोलीस स्टेशन अरोली** अंतर्गत मौजा महालगाव येथे आरोपी नामे १) चंद्रशेखर उर्फ बाल्या रामदास शेंडे, वय ४८ वर्ष, २) किसन सहदेव मारबते, वय ६२ वर्ष, ३) सचीन हरीभाउ गाढवे, वय ३६ वर्ष ४) रामभाउ यादव गाढवे, वय ५४ वर्ष, सर्व रा. महालगाव, ता.मौदा, जि. नागपुर ५) राकेश नागोराव बोरकर, वय ४० वर्षे, ६) रामशंकर शत्रुगन भोयर, वय ४५ वर्ष, ७) विकास मोहवंत बांते, वय ४५ वर्षे, सर्व रा. माहालगाव ता. मौदा जि. नागपुर हे ५२ ताशपत्त्याचा जुगार खेळताना मिळुन आल्याने त्यांचे ताब्यातून ५२ ताशपत्ते व नगदी ९००/— रूपये असा एकुण ११००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. **पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** अंतर्गत मौजा टाकळघाट शिवार बाजार परिसर तसेच मौजा भारकस बजाज कंपनी समोर फुटपात येथे आरोपी नामे १) पंकज उत्तम डोंगरे, वय ३८ वर्षे, रा. वार्ड क्र ०६, बुटटीबोरी २) प्रज्वल प्रकाश शेन्डे, वय २५ वर्षे, रा. हरी ओम नगर, टाकळघाट, ता. हिंगणा, जि. नागपुर हे सट्टापट्टी चालवित असताना आल्याने एकुण ११५५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

**वर नमुद आरोपीतांविरूध्द महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये एकुण ०७ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.**

# अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध २७ गुन्हे नोंद

दिनांक २९/०४/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, विदेशी दारू, मोहाफुल दारू असा एकुण १४,४००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण २७ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन पारशिवनी** अंतर्गत ०१ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन काटोल येथे** ०९ गुन्हे नोंद आहे. **पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे ०२ गुन्हे नोंद आहे. **पोलीस स्टेशन नरखेड** येथे ०४ गुन्हे नोंद आहे. **पोलीस स्टेशन खापा येथे** ०३ गुन्हे नोंद आहे. **पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे ०१ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन सावनेर येथे ०१** गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन वेलतूर** येथे ०१ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन उमरेड** येथे ०२ गुन्हे नोंद आहे. **पोलीस स्टेशन भिवापूर** येथे ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** येथे ०२ गुन्हे नोंद आहे.

**नमुद कारवाईत एकुण १) ८२ लिटर मोहाफुल गावठी दारू २) १२७८० मिली देशी दारू, ९०० मिली विदेशी दारू, असा एकुण १४,४००/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने